**कार्यालयीन परिपत्रक 446 दि.१९.०१.२०१६**

१. धर्मादाय संघटनेतील कर्मचा-यांची सामाईक प्रवेशोत्तर विभागीय परीक्षा दि.२१.०२.२०१६ रोजी प्रादेशिक विभाग प्रमुख यांचे स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. सदर परिपत्रकाची नोंद सर्व कार्यालय प्रमुखांनी घेऊन त्यांचे कार्यालयातील सर्व कर्मचा-यांना सदर बाब निदर्शनास आणावी.

२. सदर विभागीय परीक्षेसाठी निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाची पुस्तके मुळ संचात उपलब्ध न झाल्यास त्यांच्या छायांकीत प्रती संबंधित कर्मचा-यांनी स्वखर्चाने उपलब्ध करुन घ्याव्यात. अशा छायांकीत प्रती कर्मचा-यांनी सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयातील अधिकारी / अधिक्षक यांचेकडून प्रमाणित करुन घेण्यात याव्यात.

३. सदर विभागीय परीक्षेकरीता तयार करण्यात आलेल्या प्रश्नपेढी व त्यावरील उत्तरतालिका यांमध्ये आढळून आलेल्या त्रुटींची दुरुस्ती करुन सुधारीत प्रश्नपेढी व उत्तरतालिका यांचा संच यासोबत पाठविण्यात येत आहे.

४. वरील तिनही बाबी कार्यालय प्रमुखांनी संबंधित कर्मचारी वर्गाच्या निदर्शनास आणाव्यात व तसा अभिलेख त्यांच्या दप्तरी जतन करावा.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

सर्व धर्मादाय सह आयुक्त,

सर्व धर्मादाय उप आयुक्त,

सर्व सहायक धर्मादाय आयुक्त,